| | |
|---|---|
| **MHSI050002042025** | **प्रकरण दाखल तारीख** : २६/०६/२०२५<br>**प्रकरण नोंद तारीख** : २६/०६/२०२५<br>**निकालाची तारीख** : ०९/०६/२०२६<br>**कालावधी** :००वर्षे ११ महिने १८ दिवस |

**भाग-अ**

**वेंगुर्ला येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वेंगुर्ला यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी श्री. सौरभ जे. चिवटे)

**दि.०९/०६/२०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०४/२०२५** **निशाणी क्र.०६ लगत**

**दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,**
**कुडाळ क्र.०१, गु.नों.क्र.९४/२०२५**

**अभियोग पक्ष** - महाराष्ट्र सरकार तर्फे
दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
कुडाळ क्र.०१.

**प्रतिनिधीत्व** - श्रीमती ए.ए.पवार साहेब
सहा.सरकारी अभियोक्ता

**विरुध्द**

**बचाव पक्ष** - राजेंद्र शांताराम कांबळी
वय –५५ वर्षे, धंदा–शेती,
रा. उभादांडा (कांबळीवाडी),
ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग.

**प्रतिनिधीत्व** - विधीज्ञ श्रीमती टि.एस.कांबळी साहेब

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०२/०५/२०२५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०२/०५/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २६/०६/२०२५ |
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविलेचा दिनांक | २२/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, दिली असेल तर | - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक / भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | जामिनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली अथवा मुक्त केले, | काय शिक्षा दिली | भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ प्रमाणे आरोपीचा कारागृहातील वजावट होण्यास पात्र आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेंद्र शांताराम कांबळी | ०२/०५/२०२५ | १८/०८/२०२५ | महा. दारूबंदी अधि. ६५(ई) | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग-क
## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| १ | प्रसाद अनंत खटाटे | फिर्यादी (नि.क्र.०६ लगत) |
| २ | मुकुंद रावजी तारी | जप्ती व घटनास्थळ पंच (नि.क्र.०६ लगत) |

अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीने त्याच्या बचावाकरीता कोणताही साक्षपुरावा अभिलेखावर सादर केला नाही.

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालय निशाणी यादी

**अ.अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | पी-१/पीडब्ल्यू१ | फिर्याद |
| २ | पी-२/पीडब्ल्यू१ | छापील फिर्याद |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक ०९/०६/२०२६)

१. सदरचा खटला हा आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,**

अ) दि. ०२/०५/२०२५ रोजी फिर्यादी श्री.पी.ए.खटाटे, यांना माहिती मिळाली की, राजेंद्र कांबळी नामक इसम हा मौजे- उभादांडा, कांबळीवाडी, ता. वेंगुर्ला येथे गोवा बनावटी दारुची विनापरवाना बेकायदा चोरटी विक्री करीत आहे. माहितीच्या अनुषंगाने फिर्यादी त्यांचे सहका-यांसहीत घटनास्थळी गेले असता तेथे आरोपी मिळून आला. त्यावेळी आरोपीच्या ताब्यातील पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटी दारुच्या बॉब्स लेमन

व्होडकाच्या एकूण ८१ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. आरोपी हा सदर दारु विक्री करणेचे उद्देशाने बेकायदा बिगरपरवाना बाळगले स्थितीत मिळून आल्याने, फिर्यादीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली.

ब) गुन्ह्याचा तपास, श्री.आर.बी.मोरे, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ क्र.०१ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, तपास टिपण तयार केले व आरोपीविरूध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ नुसार अंतिम अहवाल दाखल केला.

३. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याला त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या गुन्हयाचा तपशील समजावून सांगणेत आला. आरोपीने गुन्हा कबूल करण्यास नकार दिल्याने त्याचेविरूध्द खटला चालविण्यात आला.

४. अभियोगपक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार व आरोपीपक्षातर्फे वकील श्रीमती टि.एस.कांबळी यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. आरोपीच्या बचावानुसार आरोपीविरूध्द प्रस्तुतची खोटी केस दाखल करणेत आलेली आहे.

६. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न माझ्या निर्णयाकरता उपस्थित झाले असून त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपी हा दि.०२/०५/२०२५ रोजी सकाळी ०८.४५ वाजणेच्या सुमारास मौजे-उभादांडा (कांबळीवाडी), ता.वेंगुर्ला येथील त्याच्या राहत्या घराच्या मागील बाजूस एका पिशवीत विनापरवाना गोवा बनावटी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत: जवळ बाळगले स्थितीत मिळून आला व त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोगपक्ष सिध्द करतो का ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता केली.** |

## कारणमिमांसा

७. आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने प्रस्तुतकामी फिर्यादी श्री.पी.ए.खटाटे (अ.सा.क्र.०१) व जप्ती व घटनास्थळ पंच मुकुंद रावजी तारी (अ.सा.क्र.०२) यांना तपासले आहे. अनेकवेळा साक्षीसमन्स पाठवून देखील इतर साक्षीदार न्यायालयात साक्ष देण्याकरीता हजर न राहिल्याने नि.०१ कडील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**वादप्रश्न क्र.१ व २ करीताः-**

८. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी श्री.पी.ए.खटाटे (अ.सा.क्र.०१) यांनी त्यांचे साक्षीमध्ये फिर्यादीमधील कथनांचा पुनरुच्चार केला आहे. फिर्यादी श्री.पी.ए.खटाटे (अ.सा.क्र.०१) यांच्या मुख्यत्त्वे कथनानुसार घटनेवेळी आरोपीच्या ताब्यात गोवा बनावटी दारुच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या एकूण ८१ प्लॅस्टीक सिलबंद बाटल्या मिळून आल्या. त्यावेळी दोन पंचांसमक्ष दुय्यम निरीक्षक यांनी पंचनामा करुन जप्त मुद्देमालापैकी दोन बाटल्या रासायनिक पृथ:करणाकरीता नमुना म्हणून काढून घेतल्या. उलटतपासादरम्यान फिर्यादी श्री.पी.ए.खटाटे (अ.सा.क्र.०१) यांनी सदरील दोन्ही पंच हे अनेक केसेसमध्ये पंच म्हणून साक्षीदार आहेत, घटनास्थळ हे गजबजलेले ठिकाण आहे व फिर्यादीमध्ये घटनास्थळावरील घराचा घर क्रमांक नमूद नाही, हे मान्य करुन इतर सर्व विरोधी सूचके नाकारली आहेत.

९. अभियोगपक्षातर्फे तपासणेत आलेले जप्ती व घटनास्थळ पंच मुकुंद (अ.सा.क्र.०२) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान दि.०२/०५/२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना बोलाविले नव्हते व त्यांचे समक्ष कोणतीही कारवाई अथवा जप्ती केली नाही असे कथन करुन अभियोगपक्षास साहाय्य केले नाही. त्यामुळे जप्ती व घटनास्थळ पंच मुकुंद यांना अभियोगपक्षातर्फे उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु, अभियोगपक्षास सहाय्य होईल असे कोणतेही कथन प्रस्तुत साक्षीदाराने केले नाही.

१०. प्रस्तुतकामी अभियोगपक्षातर्फे जप्त मुद्देमाल मधून दोन बाटल्या रासायनिक तपासाकरीता काढून घेतल्याबाबतच्या केवळ कथनाव्यतिरिक्त कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच प्रस्तुतकामी अभियोगपक्षातर्फे जप्त केलेल्या नमुन्याचा परीक्षण अहवाल

दाखल नाही. त्यामुळे तथाकथित ८१ सिलबंद बाटल्या यामध्ये गोवा बनावटीची दारू होती किंवा कसे याबाबतचा कोणताही निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे जप्ती पंचनामा शाबीत करण्यात आलेला नाही.

११. फौजदारी खटल्यामध्ये आरोपीच्या विरोधातील दोषारोप शंकेच्या पलिकडे जाऊन शाबीत करणेची जबाबदारी नेहमी अभियोगपक्षावर असते. आरोपीवर लावण्यात आलेले दोषारोप अभियोगपक्ष जोपर्यंत शाबीत करत नाही तोपर्यंत आरोपी हा निरपराध आहे असे गृहीत धरले जाते. प्रस्तुतकामी अभियोगपक्षातर्फे पृथ:करण अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नसल्यामुळे जप्त बाटल्यांमध्ये दारु होती किंवा कसे, याबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे प्रस्तुतकामी संशयाचा फायदा आरोपीला मिळतो. तसेच प्रस्तुतकामी जप्ती पंचनामा शाबीत करण्यात आला नाही. आरोपीच्या ताब्यातून दारु जप्त केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करत नाही तोपर्यंत आरोपी निर्दोष असल्याचे मानले जाईल. याकरीता वादप्रश्न क्र.०१ चे उत्तर नकारार्थी देऊन वादप्रश्न क्र.०२ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. आरोपी राजेंद्र शांताराम कांबळी यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) प्रमाणे, महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५(ई) अन्वयेच्या गुन्ह्यामधून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचा जामीन कदबा व वैयक्तिक जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. जप्त केलेला मुद्देमाल गोवा बनावटी दारुच्या बाटल्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग सिंधुदुर्ग यांचेकडे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेकरीता पाठविण्यात याव्यात.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ अन्वये रक्कम रु. १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीन द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.06.09 13:29:05 +0530

स्थळः वेंगुर्ला
दिनांकः०९/०६/२०२६.

(एस. जे. चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग-१, वेंगुर्ला.